महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत
नोंदवही ठेवणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०२३/प्र.क्र. ३०/समन्वय-२ (म-६)**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
पहिला मजला, मंत्रालय, मुंबई -३२
दिनांक : २६ मे, २०२६

**संदर्भ :-** शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. १३५/१८ (र. व का.) दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६

महाराष्ट्र लोकसेवा हक्क नियमाच्या नियम १७ नुसार नियुक्त अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकरण आणि द्वितीय अपिलीय प्राधिकरण यांनी प्रपत्र IV ५ संदर्भातील प्रकरणांसाठी एकतर हस्तलिखित किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरुपात नोंदवही ठेवणे गरजेचे होते. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने अधिनियमातील तरतुदीचे अनुपालन होत आहे ह्याची खात्री करण्यासाठी अर्जाची तारीख व अर्ज निपटारा केल्याची तारीख अनिवार्यपणे पोर्टलवर उपलब्ध करणे बंधनकारक असल्याचे निर्देश जारी केले. चाचणीदाखल तपासणी केलेल्या नऊ जिल्हयांमधील नऊ विभागांमधील ५२ कार्यालयांपैकी ५० कार्यालयांमध्ये प्रपत्र IV पोर्टलवर इलेक्ट्रॉनिक स्वरुपात तसेच हस्तलिखित स्वरुपात ठेवले नसल्याचे आढळून आले. अशाप्रकारे, प्राथमिक अभिलेख नसल्याने सेवांच्या वितरणाची व्यवहार्यता व पारदर्शकता सुनिश्चित करता आली नाही.

**परिपत्रक :-** महाराष्ट्र लोकसेवा हक्क नियम, २०१६ - नियम १७ नुसार पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी आणि द्वितीय अपिलीय प्राधिकारी नमुना चार मध्ये प्रकरणांची नोंदवही एकतर व्यक्तीश: किंवा ईलेक्ट्रॉनिक नमुन्यात ठेवील अशी तरतूद आहे.

सर्व जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क नियम, २०१६ अंतर्गत नियम १७ मधील तरतुदीनुसार पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी आणि द्वितीय अपिलीय प्राधिकारी यांनी प्राप्त अर्ज/अपिल याबाबत नमुना चार मध्ये नमूद केल्यानुसार प्रकरणांची नोंदवही ठेवण्याची कार्यवाही करावी. आणि याबाबतचा अहवाल दरवर्षी शासनास सादर करावा.

वरील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०५२६१६५१४०६७१९ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने.

KAILAS ARJUN
GAIKWAD

Digitally signed by KAILAS ARJUN GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=47D160717AE29C2D2661B5275D8B9B4CFAE93893BE65A27853145A4C04D865CD, cn=KAILAS ARJUN GAIKWAD
Date: 2026.05.26 16:52:48 +05'30'

**(कैलास गायकवाड)**
**सह सचिव, महसूल व वन विभाग**

**प्रत -**

१) मा. अपर मुख्य सचिव (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
२) मा. अपर मुख्य सचिव (सामान्य प्रशासन विभाग), मंत्रालय, मुंबई -३२
३) सर्व जिल्हाधिकारी
४) निवड नस्ती (समन्वय-२)